# Washim District Police

**Nature of Work** :- **Recovery of Stolen Property**

**Police Station** :- **Manora**

**Date of Good Work done** :- **08/05/2023**

**Brief of the work done :-**

मोटर पंप चोरी प्रकरणातील 02 आरोपी पो.स्टे. मानोरा पोलीसांच्या ताब्यात.

## मोटार पंप चोरी प्रकरणातील दोन आरोपींना अटक

देशोन्नती वृत्तसंकलन...

**मानोरा** ■ पोलीस स्टेशन अंतर्गत येत असलेल्या फुलऊमरी येथील एका शेतातील मोटारपंप चोरी केल्या प्रकरणातील दोन आरोपींना ताब्यात घेऊन पोलिसांनी अटक केली आहे.

पोलीस सुत्रा कडून प्राप्त माहिती वरून सविस्तर असे की फिर्यादी सुभाष सूर्यभान राठोड रा. फुलउमरी यांनी दिलेल्या फिर्यादी नुसार दिनांक २ मे रोजी रात्री गावातील महादेव मंदिरा जवळ दोन चोरट्यांना मोटार पंप घेऊन जाताना गावातील लोकांनी पाहिले व पकडले. याबाबत पोलिसांना माहिती देण्यात आली.त्याची चौकशी केली असता आरोपी किरण बिबिसिंग राठोड,रुपेश गणेश रुनवाल दोघेही राहणार कारोळ



(तालुका पुसद) येथील असून त्यांनी परेश कृष्णराव राठोड यांचे शेतात असलेल्या गोठ्यात ठेवलेली लक्ष्मी कंपनीची पाण्यातील मोटार किमंत १५ हजार रुपये चोरून नेत होते.फिर्यादी सुभाष सूर्यभान राठोड यांचे तक्रारी वरून पोलिसांनी आरोपी विरुद्ध गुन्हा दाखल केला आहे.

आरोपींना अटक करून न्यायालया पुढे हजर केले होते. सदर घटनेचा अधिक तपास पोलीस निरीक्षक महेश कुचेकर यांचे मार्गदर्शनाखाली जमादार गणेश जाधव करीत आहेत.(श.प्र.)